२०/०१३ ~~ब्लॉफमार्फत~~

## जिल्हा व सत्र न्यायालय,वर्धा

## निवीदा सुचना

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा यांचे आदेशानुसार जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा तसेच त्या अंतर्गत येणारे अधिनस्थ न्यायालये व तालूका न्यायालये (हिंगणघाट, सेलू, आर्वी, आष्टी, समुद्रपूर, पुलगांव व कारंजा (घा.) येथे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या विषयांकरीत प्रकरणी प्राप्त अटी व शर्तीनुसार झेरॉक्स मशीनचे माध्यमातुन झेराक्स सेवा देण्याबाबत सन २०२६-२०२७ या वर्षामध्ये करार केल्यापासुन ०१ वर्ष कालावधीकरीता आउट सोर्सिंगचे माध्यमातुन सेवा संविदा करार करावयाचा आहे. करीता स्थानिक विक्रेत्यांना/व्यक्ती/संस्था यांना सुचित करण्यात येत आहे की, ज्यांना सदर प्रकरणी सिलबंद निविदा दाखल/सादर करावयाच्या आहेत त्यांनी आपआपल्या निवीदा सिलबंद लिफाफ्यामध्ये दिनांक १३/०७/२०२६ रोजीचे ठिक सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर कराव्यात.

टिप :- झेराक्स कामकाजासंबंधीत निविदा सादर करतांना यासोबत जोडण्यात आलेल्या अटी व शर्तीचे न चुकता अवलोकन करावे.

सोबत : मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अटी व शर्ती

स्वा/-
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा

पृष्ठांकन क्र. २०२६ /बी-२३-८/२००५.
जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
दिनांक ३० /०६/२०२६

प्रतीलीपी:- माहीती व योग्य कार्यवाहीस अग्रेषित:-

१. जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता
२. जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
३. जिल्हा परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
४. तहसिल कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
५. नगर परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
६. सहा. अधिक्षक (संगणक विभाग) यांना जिल्हा न्यायालयाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशीत करण्याकरीता.

प्र. प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
वर्धा

## जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा

### परिशिष्ट-'अ'

### जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा व अधिनस्थ सर्व न्यायालयातील तसेच तालुका न्यायालयातील झेरॉक्स मशिन कामकाजाकरिता मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्धारीत करून दिलेल्या अटी व शर्ती

संदर्भ :- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. **B(W)6050 of 1992, dt. 20/02/2007**

| अ.क्र. | नियम, अटी व शर्ती |
|---|---|
| १ | झेरॉक्स कामकाजाशी संबंधीत करण्यात आलेला करार हा करार झाल्यापासुन ०१ वर्षाच्या कालावधीकरीता असेल. |
| २ | झेरॉक्स संबंधीत सेवा प्रदान करणा-या संबंधीत सेवादात्यास काळी तसेच रंगीत झेरॉक्स प्रत उपलब्ध करून देण्यासंबंधीत मशीन व इतर यंत्र सामुग्री न्यायालयाचे आवारामध्ये स्थापीत करून सेवा देणे बंधनकारक आहे. |
| ३ | ए-४ झेरॉक्स ०१ प्रतीकरीता ५० पैसे आणि ए-३ झेरॉक्सच्या ०१ प्रतीकरीता १.०० रूपये इतके शुल्क आकारावे तसेच झेरॉक्सकरीता ८० जीएसएम जाडीच्या (मानक सनशाईन झेरॉक्स पेपर) कागदाचा वापर करावा. |
| ४ | सेवा दात्याने ग्राहकांस प्रदान करावयाची झेरॉक्स प्रत ही वाचनीय म्हणजेच सुस्पष्ट असेल. ग्राहकाकडून केवळ स्वच्छ/वाचनीय झेरॉक्सकरीता शुल्क आकारले जाईल. |
| ५ | झेरॉक्स सेवा देणा-या संबंधीतांस त्याचे झेरॉक्स संबंधीत यंत्रसामुग्री स्थापीत केलेल्या जागी विद्युत सेवा उपलब्ध करून दिल्या जाईल. तथापी मासीक विद्युत देयक झेरॉक्स सेवा देणा-या संबंधीतांस दरमाह भरणे बंधनकारक असेल. |
| ६ | झेरॉक्स मशिन व इतर संबंधीत यंत्रसामुग्रीची व त्याच्या सुट्टया भागाचे कोणत्याही कारणास्तव नुकसान झाले/नादुरूस्त झाल्यास त्याकरीता झेरॉक्स सेवा देणारा संबंधीत जबाबदार असेल. याकरीता कोणत्याही परिस्थितीमध्ये ग्राहक जबाबदार असणार नाही. त्याकरीता त्याने आवश्यक विमा कवच उतरविले पाहिजे. या कारणास्तव सेवेमध्ये खंड पडणार नाही व ग्राहकांस असुविधा होणार नाही याची हमी त्याने घेतली पाहिजे. |
| ७ | झेरॉक्स सेवा देणारा झेरॉक्स संबंधीत मशिन व इतर यंत्रसामुग्री नियमीत अद्यावत ठेवेल. झेरॉक्स मशिन किंवा संबंधीत यंत्रसामुग्रीमध्ये बिघाड झाल्यामुळे ग्राहकांना मिळणा-या झेरॉक्स सेवेमध्ये खंड पडणार नाही याची सेवा देणा-या संबंधीतांने हमी घ ोणे आवश्यक आहे. |
| ८ | झेरॉक्स मशिन संबंधीत सेवा ही सेवादात्यास सकाळी ९.०० ते संध्याकाळी ७.०० वाजेदरम्यान नियमीत द्यावी लागेल. तसेच ग्राहकाला आवश्यक असल्यास रविवार तसेच शासकीय सुट्टीच्या दिवशी/सामान्य कामकाजाच्या वेळेच्या पलिकडे सांगितलेली सेवा प्रदान करण्यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारल्या जाणार नाही. |
| ९ | झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्था करार कालावधीमध्ये दर तीन महिन्यांनी जमा केलेल्या रक्कमेच्या तिन टक्के सवलत देईल. |
| १० | झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्था काढण्यात आलेल्या छायाप्रतीची दैनिक माहिती ठेवले तसेच सदर माहितीचे खाते प्रत्येक महिन्याच्या शेवटी तपासल्या जाईल. त्या आधारे बिले/देयके काढल्या जाईल. |

| | |
|---|---|
| ११ | झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्था इतर कोणत्याही व्यक्ती/पक्षाचे झेरॉक्स काम स्विकारणार नाही./हाती घेणार नाही. |
| १२ | झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्थाचे संबंधीत व्यक्तीकडून झेरॉक्स काढतांना मुळ दस्तऐवजाशी छेडछाड करणार नाही/नुकसान पोहचवणार नाही. तसे झाल्यास झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्था त्याकरिता जबाबदार असेल. |
| १३ | झेरॉक्स करारासाठी झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्था बिनशर्त बॅक गॅरंटी रूपये ५०,०००/- सादर करेल. |
| १४ | झेरॉक्स सेवा देणा-या व्यक्ती/संस्थेला झेरॉक्स सेवेकरीता उपलब्ध करून दिलेली जागा तो खाली करून मागीतल्यानंतर ०७ दिवसाचे आत जागा खाली करून देईल. त्याकरीता कोणत्याही प्रकारची हुज्जत घालणार नाही. |
| १५ | झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्था यांना करार पुढे चालु ठेवावयाचा असल्यास तो चालु कराराची मुदत संपण्याच्या ९० दिवस आधी त्याची माहिती देईल. तथापी कराराचे नुतनीकरण करावयाचे किंवा कसे याचे अधिकार या संस्थेकडे/कार्यालय प्रमुखाकडे सुरक्षीत असेल. |
| १६ | झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्थेला ३० दिवसांची लेखी सुचना देवून मुदतीपुर्वी करार संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल. असे असल्यास झेरॉक्स युनिट चालविण्याकरिता दिलेली जागा कोणत्याही प्रकारची हुज्जत न घालता खाली करून देईल. |
| १७ | झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्था हया केलेल्या कराराचे अनुषंगाने सेवा देत नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा त्यांची सेवा असमाधानकारक वाटल्यास सदरचा करार हा मुदतीपुर्वी एक महिन्यापुर्वी नोटीस देवून मुदतीपुर्वी मोडीत काढण्याचा अधिकार हा या कार्यालय प्रमुखाकडे/प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा यांचेकडे सुरक्षीत असेल. |
| १८ | झेरॉक्स मशिन सेवा संदर्भात वेळोवेळी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून प्राप्त निर्देश सुचना हया झेरॉक्स मशिन सेवा देणा-या व्यक्ती/संस्था यांचेवर बंधनकारक असेल. |
| १९ | झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्था यांचेसोबत करण्यात आलेला करार हा जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा तसेच अधिनस्थ दुय्यम न्यायालये तसेच वर्धा न्यायीक जिल्हयातील सर्व तालुका न्यायालये (हिंगणघाट, पुलगांव, आर्वी, आष्टी, कारंजा, सेलु, समुद्रपूर तसेच ग्रामन्यायालय सेवाग्राम, देवळी, अल्लीपुर इत्यादी न्यायालयांकरीता) येथे झेरॉक्स संबंधीत सेवा देण्याकरीता करण्यात येत आहे. |

प्र. प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा